स्थायी समिती
दाखल विषय – दि. १५/१२/२०२०

विषय क्रमांक :– ८२०

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम क्र.६७ (३)क अन्वये कोरोना विषाणू संसर्गाच्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये तातडीने खुल्या बाजारा मधून हाउस किपिंगच्या सेवा उपलब्ध करून घेणे, देयक अदा करणेची खालीलप्रमाणे कार्यवाही निर्देशनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.२/४८३ दि.१०/१२/२०२० चे पत्र.

मे.सागर सोमनाथ यादव यांचेकडून हाउस किपिंगची सेवा विनाकरारनामा दि.१४/५/२०२० ते १०/११/२०२० पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (३) क अन्वये सेवा घेतल्याने, मा.महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या तक्त्यामधील क्षेत्रफळावर केलेले हाउस किपिंगच्या कामकाजाचे देयक मा.घनकचरा व्यवस्थापन विभाग यांच्या हाउस किपिंग निविदे मधील पात्र निविदाधारक मे.दिशा एजन्सी यांना दिलेल्या दरापेक्षा कमी दर रक्कम रु.११.७०/- प्रती चौ.फुट – प्रती महिना जी.एस.टी.सह रक्कम रुपये रक्कम रुपये **१,०४,०४,१७७.४० (एक कोटी चार लक्ष चार हजार एकशे सत्याहत्तर रुपये, पैसे चाळीस फक्त)** अदा करण्यात येणार आहे. दि.१३/५/२०२० पासून प्रत्यक्ष केलेल्या कामास मान्यता देण्यात येणार आहे.

सदरचा खर्च अर्थशिर्षक - सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक , कोविड १९ विषाणूमुळे पसरलेली रोगराई नियंत्रित करणे, महसुली कामांसाठी – RE17F257, Covid- 19 अंतर्गत अत्यावश्यक महसुली कमांसाठी खर्च, भांडवली कामांसाठी – CE17A242/J6-30, Covid- 19 अंतर्गत अत्यावश्यक भांडवली कामांसाठी खर्च या अर्थशिर्षका मधून अदा करण्यात येणार आहे.

विषय क्रमांक :– ८२१

पुणे महानगरपालिका झोन क्र.२ – कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत (१)यशवंतराव चव्हाण शाळा, जयभवानी नगर,(२) मामासाहेब मोहोळ शाळा, केळेवाडी (३)संभाजी विद्यालय, शिवाजी पुतळा, (४) आण्णा साहेब पाटील शाळा, शास्त्रीनगर, (५) मराठा मंदिर बावधन (६) एम.आय.टी.जेन्टस (७) बालेवाडी क्रिडा संकुल येथे गाद्या, उश्या, बेडशीट, अत्यावश्यक साहित्य पुरविणे इ. कामे करणे साठी ठेकेदार मे. पी.जी. पाटील ॲण्ड कंपनी या एजन्सीकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये काम करुन घेणेस व करार करणेस तसेच याकामी दि.३१.०७.२०२० पर्यत र.रु. २६३७३२०.००/– होणारी रक्कम जी.एस.टी.सह व अधिक कर याप्रमाणे होणाऱ्या कामाचे बिल ठेकेदारास अदा करणेसाठी खालील बाबी मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/प.क्र.२/४८४ दि. १०/१२/२०२० चे पत्र.

१. गाद्या, उश्या, बेडशीट, अत्यावश्यक साहित्य पुरविणे इ. कामे दि.३०/०४/२०२० पासून दि.३१/०७/२०२० पर्यंतचे र.रु.२६३७३२०/– बील आदा करणेस ठेकेदार मे.पी.जी. पाटील ॲण्ड कंपनी यांचे याकामी होणारी रक्कम जी.एस.टी. सह व अधिक कर याप्रमाणे होणाऱ्या कामाचे बिल वेळोवेळी ठेकेदारास अदा करणेस.

२.सन २०२०–२०२१ चे अंदाजपत्रक महसुली कामांसाठी – RE17F257 Covid-19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च) या अर्थशिर्षकामधून अदा करण्यात येणार आहे.

३.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये सदरची कामे ठेकेदार मे.पी.जी. पाटील ॲण्ड कंपनी यांची नेमणूक करून त्याचे बरोबर करारनामा करण्यात येणार आहे.

विषय क्रमांक :– ८२२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे ६७ (३) (क) अन्वये कोरोना विषाणू संसर्गाच्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये तातडीने खुल्या बाजारा मधून हाउस किपिंगच्या सेवा उपलब्ध करून घेणे, देयक अदा करणेची खालीलप्रमाणे कार्यवाही मा.मुख्य सभेच्या निर्देशनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.२/४८५ दि.१०/१२/२०२० चे पत्र.

मे.सागर सोमनाथ यादव यांचेकडून हाउस किपिंगची सेवा विनाकरार नामा दि.१४/५/२०२० पासून सेवा घेतल्याने, मा.महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या तक्त्यामधील क्षेत्रफळावर केलेले हाउस किपिंगच्या कामकाजाचे देयक मा.घनकचरा व्यवस्थापन विभाग यांच्या हाउस किपिंग निविदे मधील पात्र निविदाधारक मे.दिशा एजन्सी यांना दिलेल्या दरापेक्षा कमी दर रक्कम रु.११.७०/- प्रती चौ.फुट – प्रती महिना जी.एस.टी.सह मे.सागर सोमनाथ यादव यांना ७६,३६,६२३.१४ (शहात्तर लक्ष छत्तीस हजार सहाशे तेवीस रुपये, पैसे चौदा फक्त ) अदा करण्यात येणार आहे दि.१४/५/२०२० पासून प्रत्यक्ष केलेल्या कामास मान्यता देण्यात येणार आहे. या पुढेही सदर सेवा उर्वरित एक विलगीकरण कक्ष अण्णासाहेब पाटील शाळा, कोथरूड या ठिकाणी रक्कम रु.११.७०/- प्रती चौ.फुट – प्रती महिना जी.एस.टी.सह प्रमाणे चालू ठेवण्यात येणार आहे. सदरचा खर्च अर्थशिर्षक - सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक , कोविड १९ विषाणूमुळे पसरलेली रोगराई नियंत्रित करणे, महसुली कामांसाठी – RE17F257, Covid- 19 अंतर्गत अत्यावश्यक महसुली कामांसाठी खर्च, भांडवली कामांसाठी – CE17A242/J6-30, Covid- 19 अंतर्गत अत्यावश्यक भांडवली कामांसाठी खर्च या अर्थशिर्षका मधून अदा करण्यात येणार आहे.

विषय क्रमांक :– ८२३

पुणे महानगरपालिका झोन क्र. ३ अंतर्गत वारजे-कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत स्थापित केलेल्या आयसोलेशन / CCC केंद्रामध्ये स्थापत्यविषयक दुरुस्ती कामे तसेच प्रतिबंध करण्यात येणा-या रेड झोन घोषित केलेला भाग सिल करणे कामी बांबूचे रेलिंग करणे इत्यादी कामे **मे.गाजूल कन्स्ट्रक्शन** या ठेकेदाराकडून सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ६७(३) (क) अन्वये दिनांक. ०१/०५/२०२० पासून दिनांक ३१/०७/२०२० पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) (क) अन्वये करणेस मान्यता देण्यात आली असून सदर बाब मा. मुख्य सभा यांचे निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.३/४८६ दि. १०/१२/२०२० चे पत्र.

1. वारजे-कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या उपरोक्त नमूद आयसोलेशन सेन्टर्समध्ये स्थापत्यविषयक दुरुस्ती कामे तसेच प्रतिबंध करण्यात येणा-या रेड झोन घोषित केलेला भाग सिल करणे कामी बांबूचे रेलिंग करणे पत्रा लावणे इत्यादी कामे **महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) नुसार मे. गाजूल <u>कन्स्ट्रक्शन</u>** यांचेकडून मा.महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये नमूद केलेल्या दरानुसार करून घेणेस तसेच झालेल्या कामाचे दिनांक ०१/०५/२०२० पासून दिनांक ३१/७/२०२० पर्यंत रक्कम रू. ७,९७,०५७.६० पर्यंतचे बील कारारानामां न करता खालील अर्थाशिर्षकामधून अदा करणेस.

   **अर्थाशिर्षक** :- सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक
   कोव्हीड -१९ अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)
   **RE17F257**

2. **मे. गाजूल कन्स्ट्रक्शन** यांचेबरोबर करारनामा करणेस व प्रत्यक्ष होणा-या बिलाच्या 5% सुरक्षा ठेव (अनामत रक्कम) राखुन ठेवणेस तसेच झालेल्या कामाचे बिलअदा करणेस.

विषय क्रमांक :– ८२४

कोरोना प्रतिबंधक उपाय योजने अंतर्गत श्री शिव छत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे-बालेवाडी कोविड केअर सेंटर, पुणे महानगरपालिकेचे कोविड सेंटर साठी महाराष्ट्र महानगरपालिका प्रांतिक अधिनियम क्र.६७ (३) क अन्वये कोरोना विषाणूच्या संसर्गाच्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये दाखल रुग्णांकरिता पॅकेज्ड पिण्याचे पाणी पुरविणे या कामाबाबत खालील बाबी मा.मुख्य सभेच्या निर्दशनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/४९३ दि.१४/१२/२०२० चे पत्र.

मे.सागर सोमनाथ यादव या संस्थेने महाराष्ट्र महानगरपालिका प्रांतिक अधिनियम क्र.६७ (३) क अन्वये पॅकेज्ड पिण्याचे पाणी पुरविणेस दि.१५/६/२०२० ते २९/१०/२०२० पर्यंत पासुन पिण्याच्या पाण्याचे जार पुरविणे करिता २० लिटर पाण्याचा जार प्रति जार रक्कम रुपये ७५ /- या दराने बिल अदा करण्याकरिता पश्चात मान्यता देऊन व विना करार काम करून र.रु.४,४२,९५०=०० (चार लक्ष बेचाळीस हजार नऊशे पन्नास रुपये फक्त) बिल अदा करण्यात येणार आहे. सदरचे देयक अर्थशिर्षक - सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक , १.मुख्य देखरेख वसुली वगैरे, थ.आपत्ती व्यवस्थापन विभाग, थ १ नैसर्गिक आपत्ती / अपघातग्रसतांना तातडीच्या खर्चासाठी मदत RE11R 101 या अर्थशिर्षकातून अदा करण्यात येणार आहे.

विषय क्रमांक :- ८२५

पुणे महानगरपालिका परिमंडळ क्र.३ अंतर्गत सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे अंतर्गत सिंहगड इन्स्टीट्युटचे मुलींचे वसतीगृह ए,बी,सी, पोकळे शाळा येथे स्थापित केलेल्या आयसोलेशन/क्वारंटाईन/CCC केंद्रासाठी दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना दैनंदिन सकाळी व दुपारी चहा, नाश्ता, दुपारचे व सायंकाळचे जेवण व लहान मुलांसाठी दुध गरजेनुसार बिस्लेरी पाणी बॉटल पुरविणे इत्यादी कामे १) मे.मॉर्डन केटरर्स, २)मे.रुचिरा केटरर्स, ३) मे.कॅफे साईलिला, ४) मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन या एजन्सी कडुन दि.१२/०४/२०२० पासुन आणि स्थापत्य विषयक कामे मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन यांचेकडुन सन २०१९-२० च्या शेड्युल मान्य दराने व सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३)(क) अन्वये केलेल्या खालीलप्रमाणे खर्चाची माहिती मा.मुख्य सभेकडे पश्चात अवलोकनार्थ सादर केल्याची नोंद घेण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/प.क्र.३/४९७ दि. १५/१२/२०२० चे पत्र.

१) सिंहगड कॉलेज येथील कोव्हिड १९ केअर सेंटर व कोरोना केअर सेंटर व ए-पायास्वामी, बी-यमुना व सी-गोदावरी या इमारतीमध्ये अभियंता यांचे निदर्शनाखाली स्थापत्य विषयक कामे केली आहे. (कोव्हिड पॉझिटिव्ह पेंशटचे खोल्यामध्ये मदतीसाठी व ड्रेनेज चेंबर, बाथरुम व शौचालय चोकअप झाल्यास तसेच इमारतींमधील दरवाजांचे कडी कोयंडे दुरूस्ती करणे, वॉशबेसीन दुरूस्त करणे, प्लंबींग दुरूस्ती विषयक कामे करणे, पाण्याचा पंप चालू बंद करणे व इतर साहित्य वाहतुकीस अशा सर्व बाबींचे कामे करणेसाठी पुरविणेत आलेल्या मजुरांचा सन २०१९ शेड्युल मान्य दराने कामे करणेचा मजुरांचा र.रु.७२३.६२/- प्रति दिवस असा मान्य दर आहे. तोच दर ठेकेदारांचे मजुरीसाठी धरणेत आलेला आहे.) मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन यांचे परिशिष्ट(अ)प्रमाणे दि.०१/०९/२०२० ते दि.३०/०९/२०२० अखेर कोरोंटाईन सेंटर येथे स्थापत्य विषयक कामे करणे याचा एकुण खर्च र.रु.२,३७,३४७.३६ हा १२% जी.एस.टी.सह एकुण खर्च र.रु.२,६५,८२९.०४ त्यांना आदा करणे.

२) सिंहगड कॉलेज येथील कोव्हिड १९ केअर सेंटर व कोरोना केअर सेंटर व ए-पायास्वामी, बी-यमुना व सी-गोदावरी येथे भाडेतत्वावर संगणक संच पुरविलेले आहे. मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन यांचे परिशिष्ट(ब)प्रमाणे दि.०१/०९/२०२० ते दि.३०/०९/२०२० अखेर यांचा एकुण खर्च र.रु.१४,४००/- हा १२% जी.एस.टी.सह एकुण खर्च र.रु.१६,१२८/- त्यांना आदा करणे.

३) मे.मॉर्डन केटरर्स यांचे परिशिष्ट(क) प्रमाणे दि.०१/०९/२०२० ते दि.३०/०९/२०२० अखेर गर्ल्स हॉस्टेलचे ए-पायास्वामी व सी-गोदावरी या इमारतीमधील रुग्णांना पुरविलेले २ वेळचे जेवणाचा खर्च र.रु.१२,५७,७५०/- हा १०% जी.एस.टी.सह र.रु.१३,८३,५२५/- एवढा त्यांना आदा करणे.

४) मे. रुचिरा केटरर्स यांनी माहे ऑगस्ट २०२० मध्ये सिंहगड कॉलेज येथील बी-यमुना, या कोरोंटाईन सेंटर करिता दि.०१/०९/२०२० ते दि.३०/०९/२०२० पर्यंत रुग्णांकरिता येथे जेवण र.रु.७५/-प्रति प्लेट या दराने २ वेळचे जेवण पुरविलेले आहे. तसेच दि.०१/०९/२०२० ते दि.३०/०९/२०२० येथील कार्यरत पुणे म.न.पा.सेवक व इतर कर्मचारी यांचे करिता जेवण र.रु.७५/-प्रति प्लेट या दराने २ वेळचे जेवण पुरविलेले आहे. तसेच दि. १३/०९/२०२० ते दि.३०/०९/२०२० पर्यंत ए-पायास्वामी, बी-यमुना व सी-गोदावरी येथे नाष्टा र.रु.२०/- प्रति प्लेट या दराने सकाळचा एकवेळचा नाष्टा पुरविलेले आहे. त्यानुसार दि.०१/०९/२०२० ते दि.३०/०९/२०२० अखेर त्यांचा कामाचा एकुण खर्च र.रु.१६,०८,९७५/- हा १०% जी.एस.टी.सह खर्च र.रु.१७,६९,८७२.५० एवढा त्यांना आदा करणे.

५) मे.कॅफे साईलिला यांचे परिशिष्ट(इ)प्रमाणे दि.०१/०९/२०२० ते दि.३०/०९/२०२० अखेर सकाळचा चहा, दुध व नाष्टा, दुपारचा चहा, दुध इ.पुरविलेल्या पदार्थाचा खर्च र.रु.९,१५,०९५/- हा. १०% जी.एस.टी.सह एकुण खर्च र.रु.१०,०६,६०४.५०/- आदा करणे.

६) मे.कॅफे साईलिला यांचे परिशिष्ट(प)प्रमाणे पोकळे शाळा कोरोंटाईन सेंटर, स्व.पु.ल.देशपांडे उद्यान येथील स्वॅब सेंटर येथे दि.०१/०९/२०२० ते दि.३०/०९/२०२० अखेर सकाळचे व रात्रीचे जेवण पुरविणे व पोकळे शाळा कोरोंटाईन सेंटर, स्व.पु.ल.देशपांडे उद्यान, सिंहगड कॉलेज मुलींचे वसतीगृह ए-पायास्वामी, बी-यमुना व सी-गोदावरी येथे आवश्यकतेनुसार पिण्याचे पाणी बिस्लेरी पाणी बॉटल इ.पुरविलेल्या बाबींचा खर्च र.रु.६,६८,४५०/- हा. १०% जी.एस.टी.सह एकुण खर्च र.रु.७,३५,२९५/- आदा करणे.

७) मे.कॅफे साईलिला यांचे परिशिष्ट(फ)प्रमाणे दि.०१/०९/२०२० ते दि.३०/०९/२०२० अखेर सकाळचा व दुपारचा सिंहगड कॉलेज येथील कोरोना केअर सेंटरवर व अवेटेड सेंटरवर काम करणारे अधिकारी, अभियंते, डॉक्टर्स, नर्स, सुरक्षा रक्षक, वाहन चालक, सफाई कर्मचारी यांना पुरविलेल्या चहा/कॉफी यांचा खर्च र.रु.४४,८५०/- १०% जी.एस.टी. सह एकुण खर्च र.रु.४९,३३५/- त्यांना आदा करणे.

८) वरील अ.क्र.१,२,३,४,५,६ व ७ प्रमाणे होणारा एकुण खर्चाचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | कामाचा कालावधी | पुरवठादार/ ठेकेदाराचे नाव | खर्च र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | सिंहगड कॉलेज मुलींचे वसतीगृह इमारत ए, बी, सी, येथे स्थापत्य विषयक कामे करणे. (परिशिष्ठ अ) | दि.०१/०९/२०२० ते दि.३०/०९/२०२० | मे.एस.पी. कन्स्ट्रक्शन | २६५८२९.०४ |
| २ | सिंहगड कॉलेज मुलींचे वसतीगृह इमारत ए, बी, सी, येथे भाडेतत्वावर संगणक संच, प्रिंटर पुरविणे. (परिशिष्ठ ब) | दि.०१/०९/२०२० ते दि.३०/०९/२०२० | मे.एस.पी. कन्स्ट्रक्शन | १६१२८.०० |
| ३ | सिंहगड कॉलेज मुलींचे वसतीगृह इमारत ए, सी, येथे जेवण पुरविणे (परिशिष्ठ क) | दि.०१/०९/२०२० ते दि.३०/०९/२०२० | मे.मॉर्डन केटरर्स | १३८३५२५.०० |
| ४ | सिंहगड कॉलेज मुलींचे वसतीगृह इमारत बी, येथील रुग्णांकरिता २ वेळचे जेवण पुरविणे. तेथील कार्यरत म.न.पा.सेवक इतर कर्मचारी यांचे २ वेळचे जेवण तसेच इमारत ए,बी,सी येथील कार्यरत म.न.पा.सेवक व कर्मचारी यांचा नाष्टा (परिशिष्ठ ड) | दि.०१/०९/२०२० ते दि.३०/०९/२०२० | मे.रुचिरा केटरर्स | १७६९८७२.५० |
| ५ | सिंहगड कॉलेज मुलींचे वसतीगृह इमारत ए,बी,सी येथील रुग्णांकरीता सकाळ नाष्टा व सकाळ-सध्यांकाळचा चहा, दुध (परिशिष्ठ इ) | दि.०१/०९/२०२० ते दि.३०/०९/२०२० | मे.कॅफे साईलिला | १००६६०४.५० |
| ६ | पोकळे शाळा, पु.ल.देशपांडे उद्यान स्वॅब सेंटर येथे २ वेळचे जेवण. पोकळे शाळा, पु.ल.देशपांडे उद्यान स्वॅब सेंटर व सिंहगड कॉलेज मुलींचे वसतीगृह इमारत ए,बी,सी येथे पिण्याचे पाणी बॉटल पुरविणे. (परिशिष्ठ प) | दि.०१/०९/२०२० ते दि.३०/०९/२०२० | मे.कॅफे साईलिला | ७३५२९५.०० |
| ७ | सिंहगड कॉलेज -महिला वसतीगृह ए, बी, सी येथील डॉक्टर, नर्स, म.न.पा. अधिकारी व कर्मचारी, वाहन चालक, सफाई कर्मचारी यांचेसाठी चहा पुरविणे(परिशिष्ठ फ) | दि.०१/०९/२०२० ते दि.३०/०९/२०२० | मे.कॅफे साईलिला | ४९३३५.०० |
| | | | | **एकुण खर्च र.रु. ५२,२६,५८९.०४** |

वरील अ.क्र.१ ते ७ प्रमाणे होणारा खर्च खालील अर्थशिर्षकावर करणे.
अर्थशिर्षक :- सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक
Covid 19 अंतर्गत महसुली कामांसाठी (खर्च)
RE17F257

९) वरील अ.क्र.८ प्रमाणे माहे सप्टेंबर २०२० मधील झालेल्या कामांची कार्यवाही व अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम क्र.६७(३)(क) अन्वये सदर ठिकाणचे काम संपेपर्यंत करणेस.

(टिप :- सदरचा विषय माहे डिसेंबर २०२० च्या मनपा मुख्य सभेत दाखल करण्यात यावा.)

विषय क्रमांक :– ८२६

शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय शिवाजीनगर पुणे-५ येथील जम्बो कोव्हिड हॉस्पिटल मधील कोव्हिड १९ रूग्णांचे भोजनाची व्यवस्था करण्याचे काम मे. बदामीकर केटरर्स यांना डॉक्टर, नर्स, प्रशासकीय व विशेष अधिकारी यांना रक्कम रु. २२५/- वॉर्ड बॉय व ग्राउंड स्टाफ यांना रक्कम रु. २००/- व रुग्णांसाठी रक्कम रु. १८५/- अधिक शासकीय कर याप्रमाणे मंजूर करण्यात आलेले आहेत. सदरची बाब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) अन्वये मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर केल्याची नोंद घेण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/५०१ दि. १५/१२/२०२० चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०-२१
RE17F 259
कोव्हिड १९ अंतर्गत जम्बो हॉस्पिटलसाठी खर्च.
मान्य तरतूद रक्कम रूपये ७५,००,००,०००/-

विषय क्रमांक :– ८२७

पुणे महानगरपालिकेच्या सेवकांसाठीच्या "सानेगुरूजी नगर (अंबिलओढा) वसाहतीमधील धोकादायक झालेल्या इमारतींची पुनर्बांधणी करणे" या कामासाठी वर्गीकरणाने खालीलप्रमाणे नमुद केलेले बारा कामांची रक्कम रूपये ६२०.०० लक्ष इतकी रक्कम उपलब्ध करून देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भवन/५०२ दि. १५/१२/२०२० चे पत्र.

| अ. क्र. | कामाचे नांव व बजेट हेड | रक्कम रूपये कमी | रक्कम रूपये जास्त |
|---|---|---|---|
| १ | CE22A 704 /SJ20- 266 पुणे शहरात योग केंद्र उभारणे. | ९५.०० लक्ष | --- |
| २ | CE22A 548 /SJ10- 2489 प्रभाग क्र. २९ ड हिराबाग कोठी येथील जागेवर व्यापारी संकुल तथा बहुउद्देशीय इमारत उभारणे. | १००.०० लक्ष | --- |
| ३ | CE17A242/J6-22 अर्बन ९५ बेबी फ्रेंडली हॉस्पिटल. | ६४.०० लक्ष | --- |
| ४ | CE27 A241 /J24 -1 मनपाच्या मार्फत सुरू असलेल्या विविध ठिकाणच्या क्रीडा संकुलाची अपूर्ण असलेली कामे पूर्ण करणे / सुधारणा कामे करणे. | ४०.०० लक्ष | --- |
| ५ | CE27A241/SJ24-637 मनपा शाळांमधील सर्व मोठी मैदाने कबड्डी, खोखो, हॉली बॉल, बास्केट बॉलसाठी विकसित करणे व प्रशिक्षणाची सोय करणे. | १४० लाख | --- |
| ६ | CE24A141/J33-21 उप आयुक्त कार्यालय क्र. ५ चे कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या मनपा मालकीच्या इमारतीसाठी अग्निशामक विभागाकरीता झोनल ऑफिसेस उभारणे/ अग्निशामक यंत्रणेची कामे करणे . | ३२.०० लक्ष | --- |
| ७ | CE24A141/J33-1 उप आयुक्त कार्यालय क्र. १ चे कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या मनपा मालकीच्या इमारतीसाठी अग्निशामक विभागाकरीता झोनल ऑफिसेस उभारणे/ अग्निशामक यंत्रणेची कामे करणे. | ३२.०० लक्ष | --- |
| ८ | CE24A141/J33-2 उप आयुक्त कार्यालय क्र. २ चे कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या मनपा मालकीच्या इमारतीसाठी अग्निशामक विभागाकरीता झोनल ऑफिसेस उभारणे/ अग्निशामक यंत्रणेची कामे करणे. | ३२.०० लक्ष | --- |
| ९ | CE24A141/J33-4 उप आयुक्त कार्यालय क्र. ३ चे कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या मनपा मालकीच्या इमारतीसाठी अग्निशामक विभागाकरीता झोनल ऑफिसेस उभारणे/ अग्निशामक यंत्रणेची कामे करणे. | ३२.०० लक्ष | --- |
| १० | CE24A141/J33-4 उप आयुक्त कार्यालय क्र. ४ चे कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या मनपा मालकीच्या इमारतीसाठी अग्निशामक विभागाकरीता झोनल ऑफिसेस उभारणे/ अग्निशामक यंत्रणेची कामे करणे . | ३२.०० लक्ष | --- |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | CE22A548/J10-52 प्रभाग क्र ३८ बिबवेवाडी स.नं. ६५९,६६० पार्ट पीएमटी एम एम एल साठी आरक्षित असलेल्या जागेवर बसडेपो विकसनाची कामे करणे. | २१.०० लक्ष | --- |
| १२ | पुणे महानगरपालिकेच्या सेवकांसाठीच्या सानेगुरूजीनगर (अंबिल ओढा) वसाहतीमधील धोकादायक झालेल्या इमारतींचे पुनर्बांधणी करणे. | | ६२०.०० लक्ष |
| | | ६२०.०० लक्ष | ६२०.०० लक्ष |

विषय क्रमांक :- ८२८

पुणे पेठ शिवाजीनगर स.नं.२४ वाकडेवाडी येथील गाळा क्र.१ लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर ३ वर्ष कालावधीसाठी चालविणेस देणेकामी निविदा मागविल्या असता आलेल्या १ निविदांपैकी श्री नेमाराम मानाराम चौधरी, पत्ता स.नं.२४, पीएमसी कॉलनी, संभाजीनगर, वाकडेवाडी, शिवाजीनगर, पुणे - ४११००३ यांनी देऊ केलेली मासिक रक्कम रूपये १७,१००/- ( अक्षरी रक्कम रू. सतरा हजार शंभर फक्त) मनपा निर्धारीत मासिक रक्कम रूपये १५,७६२/-( अक्षरी रक्कम रू.पंधरा हजार सातशे बासष्ट फक्त) पेक्षा रक्कम रूपये १,३३८/- (अक्षरी रक्कम रू. एक हजार तीनशे अडोतीस फक्त) ने जास्त आहे. त्याप्रमाणे आणि शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रक्कमेवर वस्तु आणि सेवा कर भरून घेणेस ताबा दिनांकापासून ३ वर्ष कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे मक्ता पद्धतीने देणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ आणि मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतूदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१४७० दि.२६.२.२०१९ चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ६० दि. १४/६/२०१९ विचारासाठी.

विषय क्रमांक :- ८२९

पुणे पेठ शिवाजीनगर स.नं.२४ वाकडेवाडी येथील गाळा क्र.२, ताबा दिनांकापासून ३ वर्ष कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर चालविणेस देणेकामी निविदा मागविल्या असता आलेल्या १ निविदांपैकी श्री नेमाराम मानाराम चौधरी, पत्ता स.नं.२४, पीएमसी कॉलनी, संभाजीनगर, वाकडेवाडी, शिवाजीनगर, पुणे - ४११००३ यांनी देऊ केलेली मासिक रक्कम रूपये २०,७००/- ( अक्षरी रक्कम रू. वीस हजार सातशे फक्त) मनपा निर्धारीत मासिक रक्कम रूपये १५,७६२/-( अक्षरी रक्कम रू.पंधरा हजार सातशे बासष्ट फक्त) पेक्षा रक्कम रूपये ४,९३८/- (अक्षरी रक्कम रू.चार हजार नऊशे अडोतीस फक्त) ने जास्त आहे. त्याप्रमाणे आणि शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रक्कमेवर वस्तु आणि सेवा कर भरून घेणेस ताबा दिनांकापासून ३ वर्ष कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे मक्ता पद्धतीने देणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ आणि मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतूदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१४६९ दि.२६.२.२०१९ चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ५९ दि. २६/२/२०१९ विचारासाठी.

विषय क्रमांक :- ८३०

मा.सौ.वर्षा तापकीर व मा.सौ.मानसी देशपांडे यांचे दि. १५/१२/२०२० चे पत्र.

पुणे शहरातील पुणे, स्वारगेट (मध्यवर्ती भाग) (दाट वस्ती) शिवाजीनगर आणि सर्व स्टेशन पेठांच्या परिसरात वाहतुकीला सोयीच्या टाईप १ सीएनजी बस खरेदी करणेसाठी र.रु. २५ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक, १०.ख. वाहतूक नियंत्रण विभाग, पान क्र. १००, अ.क्र. २, शहरामधील चौकांची सुधारणा/विकास कामे करणे, वाहतुक सुधारण्यासाठी विविध विकास कामे करणे, (यादी क्र. एसटी-२), पान क्र. २२१, अ.क्र. २९९, पुणे शहरातील (मध्यवर्ती भाग) स्वारगेट, पुणे स्टेशन, शिवाजीनगर आणि सर्व (दाट वस्ती) पेठांच्या परिसरात वाहतुकीला सोयीच्या ९ मीटर लांबीच्या ५० ई बसेस भाडे तत्वावर उपलब्ध करुन देणे | २५ कोटी | --- |

| | | |
|---|---|---|
| <u>नवीन सुचविलेले काम</u><br>पुणे शहरातील पुणे, स्वारगेट (मध्यवर्ती भाग) (दाट वस्ती) शिवाजीनगर आणि सर्व स्टेशन पेठांच्या परिसरात वाहतुकीला सोयीच्या टाईप १ सीएनजी बस खरेदी करणे | --- | २५ कोटी |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :- ८३१

मा.प्रमोद ओसवाल व मा.दिपक पोटे यांचे दि. १५/१२/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात विविध सामाजिक संस्थांना देणगी देण्यासाठी तरतुद करण्यात येते त्यानुसार सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात संस्थांना देणगी देण्यासाठी तरतुद करण्यात आलेली होती. त्यांना अर्ज सादर करणेसाठी दि.३१ ऑगस्ट २०२० पर्यंत मुदत देण्यात येते परंतु कोरोनाचा प्रादुर्भाव असल्याने मार्च २०२० पासून गेल्या सुमारे ८ महिन्यांपर्यंत अनेक संस्था बंद होत्या त्यामुळे अनेक संस्थांना अर्ज सादर करता आलेले नाहीत त्यामुळे सदर संस्थांना अर्ज व कागदपत्रे सादर करण्यासाठी दि.३१ जानेवारी २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :- ८३२

मा.राजेंद्र शिळीमकर, मा.सौ.वर्षा तापकीर व मा.सौ.मानसी देशपांडे यांचे दि. १५/१२/२०२० चे पत्र.

संकल्प स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. ही सहकार तत्वावर चालविण्यात येणारी रजिस्टर संस्था असून या संस्थामधून अनेक गोरगरीब महिला व गरजू लोकांना रोजगार उपलब्ध होतो.

त्यामुळे संकल्प स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. यांसकडून शासन निर्णय २००२ नुसार विविध सवलती देऊन क्षेत्रिय कार्यालयास र.रू.३ लाखापर्यंत लागणा-या सेवा व वस्तू घेण्यासाठी कामे विना निविदा काढण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :- ८३३

मा.सौ.रुपाली धाडवे, मा.सौ.वृषाली चौधरी, मा.सौ.वर्षा तापकिर व मा.सौ.उज्ज्वला जंगले यांचे दि.१५/१२/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिका कर आकारणी व कर संकलन विभागाकडील संपूर्ण कामकाज सध्य:स्थितीमध्ये संगणकीय प्रणालीमध्ये केले जात आहे. सदर संगणकीय कामकाज करणेकरीता सदर विभागामध्ये संगणक अभियंता यांची माहे मार्च २०१३ पासून एकवट मानधन तत्वावर दर सहा महिनेकरीता नेमणूक करण्यात येते. सदर नेमणूक करण्यात आलेल्या संगणक अभियंते यांचे मार्फत कर आकारणी व कर संकलन विभागाकडील संपूर्ण सॉफ्टवेअर प्रणाली कार्यान्वित करून संगणकीय कामकाज करण्यात येत आहे.यामध्ये प्रामुख्याने आर्थिक वर्षाचे बिल जनरेशन ,संगणकीय कर आकारणी,कर संकलन,मिळकतीचा दाखला, नाव हस्तांतरण प्रक्रिया,ना-हरकत प्रमाणपत्र,ऑनलाईन पेमेंट सिस्टीम,थकबाकी धारकांना वेळेवर कर भरणेकरीता एस.एम.एस.व ई-मे पाठविणे,थकबाकी धारकांची दरमहा २ टक्के शास्तीची आकारणी करणे,नागरी सुविधा केंद्र(सीएफसी सेंटर) सॉफ्टवेअर,चेक बाउंस प्रणाली,रिपोटे जरनेशन,सॉफ्टवेअर प्रणालीची देखभाल व दुरुस्ती,तसेच नविन समाविष्ट ११ गावांची कर आकारणी व कर संकलन प्रणाली इ.हे कामे करण्या येतात. तसेच सध्य:स्थितीमध्ये काळाच्या बदलाप्रमाणे पुणे शहरातील मिळकत धारक हे मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन पध्दतीने कर भरत आहेत. यामध्ये १७ प्रकारचे ऑनलाईन कर भरण्याची सुविधा असलेले पुणे मनपा ही भारतातील एकमेव महानगरपालिका आहे. सदर कामकाजामार्फत पुणे मनपाचे उत्पन्न वाढविण्याचे कार्य मोठया प्रमाणावर होत असते.

तसेच सदर संगणक अभियंते हे पदे कायम स्वरूपी भरणे बाबतची शासन मान्यता सन २०१४ च्या आकृतीबंधात नमूद आहे. त्याकरीता सदर पदे कायमस्वरूपी भरणे हे अत्यंत महत्वाचे आहे.

तरी पुणे मनपा कर आकारणी व कर संकलन विभागाकडे सध्य:स्थितीमध्ये कार्यरत असलेले संगणक अभियंते यांची कायम स्वरूपी नियुक्ती करणेकरिताची पुढील कार्यवाही करण्यात यावी,तसेच सदरची संगणक प्रणाली क्लिष्ट स्वरूपाची असून महसुलीच्या दृष्टीने अतिशय महत्वाची असल्याने अनुभवी सेवकांची आवश्यकता आहे. त्याच अनुषंगाने सदर भरती प्रक्रियेमध्ये सध्य:स्थितीमध्ये कार्यरत असलेले संगणक अभियंता यांना प्राधान्य देण्यात यावे,जेणे करून सदर संगणक अभियंता यांच्या अनुभवाचा लाभ होईल व याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

विषय क्रमांक :– ८३४

पुणे मौजे हडपसर येथील स.नं. ३११/५(पै.) (जुना) स.नं. ३११/१अ/१ब (पैकी)/१क/५(नविन) येथील २४ मी. डी.पी. रस्त्याचा टी.डी.आर. देणेपोटी दि.२१/७/२०१७ रोजी पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेत आलेल्या एकूण १४८२.३९ चौ.मी. क्षेत्राची तडजोडीने ताब्याची कार्यवाही होवून ७/१२ उताऱ्यावर मनपाचे नावाची नोंद आहे. त्यामुळे भूसंपादन कार्यवाही चालू असलेले बाधित २४ मी.डी.पी. रस्त्याचे क्षेत्र १४८२.३९ चौ.मी. भूसंपादन कार्यवाहीतून वगळणेबाबत व सदर क्षेत्राची भूसंपादन कार्यवाही कायमस्वरुपी रद्द करणेस मा.जिल्हाधिकारी, भूसंपादन शाखा, पुणे तसेच मा.विशेष भूमि संपादन अधिकारी क्र. १६, पुणे यांना कळविणेत येत असल्याची बाब अवलोकनार्थ सादर केल्याची नोंद घेण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भुसंपादन/४७९ दि. ९/१२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ८३५

पुणे शहरातील अनधिकृत व बेकायदेशीर जाहिरात फलकांबाबत मा.अरविंद शिंदे यांचे दि.१२/३/२०२० चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १२० दि. १२/५/२०२० ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी क्र. मआ/परवाना व आकाशचिन्ह/४८१ दि. ९/१२/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

विषय क्रमांक :– ८३६

पुणे शहरातील बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत डांबरी व कॉंक्रीट रस्त्याचे रोड मेन्टेनस व्हॅनद्वारे वार्षिक देखभाल दुरुस्ती विषयक कामे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रुषभ कंन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८९,१४,९७३/– पेक्षा १.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८८,२५,८२३=२७ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,६९,७९६=७६ पर्यंत विशेष भाववाढ सुत्रानुसार अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/४८७ दि. १०/१२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ८३७

प्रभाग क्र. ८ ब मधील बॅडमिंटन हॉलचे उर्वरीत कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.विराई इन्फ्रा.प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३५,१५,९७५/– पेक्षा ०.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३४,८१,१६६=८४ उपलब्ध तरतुदी रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ४,२४,३७४/– पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये १,४१३=४० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग र.रुपये २०,४७५/– पर्यंत अधिक निविदा अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टाररेट) सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/४८८ दि.१०/१२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ८३८

पुणे मनपाकरीता डी टाईप अत्याधुनिक सुसज्ज फॅब्रिकेशनसह व सुसज्ज वैद्यकिय उपकारणांसह कार्डीयाक रुग्णवाहिका टेंडर स्पेसीफीकेशन प्रमाणे खरेदी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडरपैकी मे. एक्सेल व्हेइकल्स (ए युनिट ऑफ माय कार पुणे प्रा.लि) पुणे यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु. १,३८,६४,६००/– रकमेपेक्षा (–) ६.४८६% ने कमी) असल्याने त्यांचेकडून त्यांचे टेंडर दराने १ नग करीता रक्कम रु. ३२,४१,३३५.५१ (अक्षरी र.रु.बत्तीस लाख एक्केचाळीस हजार तीनशे पस्तीस रुपये एक्कावन्न पैसे) जीएसटी, वाहतुक, आरटीओ रजिस्ट्रेशन, फॅब्रिकेशन व सुसज्ज वैद्यकिय उपकारणांसह या सर्व खर्चासह याप्रमाणे २ नग कार्डीयाक रुग्णवाहिका करीता र.रु. ६४,८२,६७१.०२ (अक्षरी र.रु. चौसष्ठ लाख ब्याऐंशी हजार सहाशे एकाहत्तर रुपये दोन पैसे) जीएसटी , वाहतुक, आरटीओ रजिस्ट्रेशन, फॅब्रिकेशन व सुसज्ज वैद्यकिय उपकारणांसह या सर्व खर्चासह खरेदी करणेस व त्याकामी त्यांचे बरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/४८९ दि. १०/१२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ८३९

नागरी सुविधा केंद्र (CFC)चालविण्याकरिता निविदा मागविली असता आलेल्या तीन निविदाधारकांपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक मे.धनदाई सोल्यूशन प्रा.लि. यांचा असल्याने त्यांचेकडून काम काम करुन घेणेसाठी व त्यांचेबरोबर करारनामा करणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/माहिती व तंत्र/४९१ दि. ११/१२/२०२० चे पत्र.

१. नागरी सुविधा केंद्र (CFC)चालविण्याकरिता मे.धनदाई सोल्यूशन प्रा.लि. यांचा दर र.रू. १६९५५=२९० प्रती मनुष्यबळ प्रती महिना याप्रमाणे ३ वर्षोसाठी कामकाज करून घेणेस,
२. मे.धनदाई सोल्यूशन प्रा.लि यांचेबरोबर निविदेतील अटी व शर्तीनुसार करारनामा करणेस,
३. नागरी सुविधा केंद्र चालविण्यासाठी १०० मनुष्यबळ प्रती महिना उपलब्ध करून घेणेस व प्रती मनुष्यबळ प्रती महिना रक्कम रू.१६९५५=१२ +०.००१% + टॅक्स या प्रमाणे अदा करणेस,
४. मे.धनदाई सोल्यूशन प्रा.लि. यांना मे.राज्य शासनाच्या वेळोवेळी सुधारीत केलेल्या किमान वेतन कायदा नियम १९४८ नुसार वेतनावर ०.००१% अधिक वेतन बिल अदा करणेस,
५. सदरचा खर्च खालील अर्थशिर्षकावर टाकणेस.

**RE11N103**

सन २०२०-२०२१

१ मुख्य देखरेख वसुली वगैरे.

'ड' सांख्यिकी व संगणक कार्यालय

३ विशेष प्रकारची हिशोबी कामे संगणकामार्फत करुन घेणे व तद्नुषंगिक कामे करणे

विषय क्रमांक :- ८४०

भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात असणाऱ्या झोपडपट्टी परिसरामध्ये अस्तित्वातील असलेल्या मलवाहिन्यांचा प्रवाह सुरळीत करणेसाठी आवश्यकतेनुसार मलवाहिन्या विकसित करणे तसेच अचानक उद्‌भवलेली कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.यश चंद्रकांत पोळ यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२८,१२,४०७/- पेक्षा २.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २७,५६,१५८=८६ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रुपये ३,३०,७३९=०६ असे एकुण र.रु. ३०,८६,८९७=९२ होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/४९४ दि.१४/१२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :- ८४१

लोकल पर्चेस अंतर्गत परवानाधारक औषध विक्रेत्याकडून अंशदायी वैद्यकिय सहाय्य योजनेकरीता दैनंदिन स्वरुपात औषधे व इतर साहित्यांची खरेदी करणे (टेंडर क्र. १६, सन २०२०-२१) कामी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण पाच निविदाधारकांनी त्यांच्या निविदा सादर केलेल्या असून सर्वात कमी दर देणारे निविदाधारक मे. लक्ष्मी मेडीकल्स यांचेकडून अंशदायी वैद्यकिय सहाय्य योजनेअंतर्गत दैनंदिन स्वरुपात लागणारी जेनेरिक औषधांच्या व इतर साहित्यांच्या छापील किमतीवर ६८% इतका डिस्काऊंट (सूट) जी.एस.टी. करासहीत व अंशदायी वैद्यकिय सहाय्य योजनेअंतर्गत दैनंदिन स्वरुपात लागणारी ब्रॅन्डेड औषधांच्या व इतर साहित्यांच्या छापील किमतीवर ३०% इतका डिस्काऊंट (सूट) जी.एस.टी. करासहीत घेवून पात्र निविदाधारक मे. लक्ष्मी मेडीकल्स यांचेकडून रक्कम रु. ७,००,००,०००/- (रक्कम रुपये सात कोटी फक्त) पर्यंत सन २०२०-२१ मध्ये अर्थसंकल्पीय उपलब्ध आर्थिक तरतुदीपर्यंत औषधे व इतर साहित्यांची खरेदी करणेस व त्यांच्या समवेत आवश्यक तो करार करणेस आणि खाली नमूद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/४९८ दि.१५/१२/२०२० चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०-२१

"RE17 F 258 COVID - 19"

‘‘आरोग्य विभाग कोविड -१९ अंतर्गत विविध दवाखाने व रूग्णायांसाठी वैदयकिय उपाराची साधने खरेदी करणे (रूग्णालयाकरीता आयसीयु सुरू करणेकरीता शस्त्रे ,उपकरणे ,ऑक्सीजन सिलेंडर ,एन ९५ मास्क ,पीपीई किट ,व्हीटीएम किट खरेदी) ’’

मान्य तरतुद

र.रु. १९,००,००,०००/- पैकी र.रु.७,००,००,०००/-

विषय क्रमांक :– ८४२

आर्थिक दुर्बल गटासाठी आरोग्य सहाय्य योजनेअंतर्गत परवानाधारक औषध विक्रेत्यांकडून दैनंदिन स्वरुपात औषधे व इतर साहित्य खरेदी करणे (टेंडर क्र. १५, सन २०२०–२१) कामी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण पाच निविदाधारकांनी त्यांच्या निविदा सादर केलेल्या असून सर्वात कमी दर देणारे निविदाधारक मे. लक्ष्मी मेडीकल्स व मे. एस. बी. जोशी ॲन्ड कंपनी यांचेकडून आर्थिक दुर्बल घटक यांजनेअंतर्गत दैनंदिन स्वरुपात लागणारी जेनेरिक औषधांच्या व इतर साहित्यांच्या छापील किंमतीवर ६८% इतका डिस्काऊंट (सूट) जी.एस.टी. करासहीत व मे. लक्ष्मी मेडीकल्स यांचेकडून आर्थिक दुर्बल घटक यांजनेअंतर्गत दैनंदिन स्वरुपात लागणारी ब्रॅन्डेड औषधांच्या व इतर साहित्यांच्या छापील किमतीवर ३०% इतका डिस्काऊंट (सूट) जी.एस.टी. करासहीत घेवून पात्र निविदाधारकांकडून रक्कम रु. ७,००,००,०००/– (रक्कम रुपये सात कोटी फक्त) पर्यंत औषधे व इतर साहित्यांची खरेदी करणेस, त्यांच्या समवेत आवश्यक तो करार करणेस आणि खाली नमूद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/४९९ दि.१५/१२/२०२० चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०–२१

"RE17 F 258 COVID - 19"

''आरोग्य विभाग कोविड –१९ अंतर्गत विविध दवाखाने व रूग्णायांसाठी वैदयकिय उपाराची साधने खरेदी करणे (रूग्णालयाकरीता आयसीयु सुरू करणेकरीता शस्त्रे ,उपकरणे ,ऑक्सीजन सिलेंडर ,एन ९५ मास्क ,पीपीई किट ,व्हीटीएम किट खरेदी) ''

मान्य तरतुद

र.रु.१९,००,००,०००/– पैकी र.रु.७,००,००,०००/–

विषय क्रमांक :– ८४३

पुणे महानगरपालिकेच्या श्री.दत्तात्रय वळसे पाटील नेत्र रूग्णालयासाठी नेत्रचिकित्सा विषयक वैदयकीय उपकरणे खरेदी करणे. ( टेंडर क्रमांक ११ सन २०२०-२१ ) कामी निविदा मागविल्या असता एकुण तीन निविदाधारकांपैकी ज्या निविदाधारकांनी ज्या उपकरणांसाठी सर्वात कमी दर दिलेला त्यांचेकडून ते ते उपकरण खरेदी करण्यात येणार असल्याने १. कार्ल झाईस इंडिया ( बेंगलोर) प्रा.लि. यांचेकडून जीएसटी करासह मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रामध्ये नमुद तक्त्याप्रमाणे रक्कम रूपये १,०३,००,००० /- २.कोठारी मेडिकल यांचेकडून जीएसटी करासह मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रामध्ये नमुद तक्त्याप्रमाणे रक्कम रूपये १,२०,३६,९००/- असे एकुण जीएसटी करासह रक्कम रूपये २,२३,३६,९००/- ( अक्षरी रक्कम रूपये दोन कोटी तेवीस लाख छत्तीस हजार नउशे फक्त ) पर्यंत वैदयकीय उपकरणांची खरेदी करणेस, त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस व खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकांवर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/५०५ दि. १५/१२/२०२० चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०-२१

CE17A242/SJ6-565

वळसे पाटील- बोपोडी पुणे मनपा व व्हिजन नेक्सट संयुक्त प्रकल्प.

मान्य तरतूद रक्कम रूपये १,८०,००,०००/-

शिवाजी दौंडकर
प्रभारी नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.